02 JAN 2025

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वाचनातून जाणिवासमृद्ध माणूसपण घडते : डॉ. देवळालकर

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

वाचन ही सातत्यपूर्ण प्रक्रिया असून, वाचनातूनच जाणिवासमृद्ध माणूसपण घडते, असे प्रतिपादन राजाराम महाविद्यालयातील डॉ. धनंजय देवळालकर यांनी केले. महाराष्ट्र शासनाच्या 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या उपक्रमांतर्गत शिवाजी विद्यापीठात बुधवारी सकाळी वाचन कौशल्य कार्यशाळा आणि सामूहिक वाचन उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.



डॉ. देवळालकर म्हणाले, अभ्यासातील क्रमिक पुस्तके आपल्याला हुशार बनवतात; पण शहाणे व्हायचे असेल, तर अवांतर वाचनाकडे वळायला हवे. अवांतर पुस्तके खऱ्या अर्थाने विवेकी माणूस घडवतात आणि जगाकडे पाहण्याचा दृष्टिकोन प्रदान करतात. पुस्तकांच्या वाचनातूनच समाजाला आधार देणारे अदृश्य स्तंभ घडवले जातात. विद्यार्थ्यांनी स्वानंदासाठी वाचले पाहिजे. प्रज्ञावंत होण्यासाठी वाचन हे अत्यावश्यक आहे.

प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील म्हणाले, वाचनातून आपल्याला नेमके काय साध्य करावयाचे आहे, समजून घ्यायचे आहे, ते विद्यार्थ्यांनी मनाशी ठरवले पाहिजे. अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, विद्यार्थ्यांनी जगभरातील व्यक्तिमत्त्वांना पुस्तकाच्या माध्यमातून जाणून घेतले पाहिजेच; पण त्याचबरोबरीने आपल्या परिसरातील, भोवतालातील माणसांनाही पुस्तकाद्वारे जाणून घेतले पाहिजे.

बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. धनंजय सुतार यांनी प्रास्ताविक केले. उप ग्रंथपाल डॉ. प्रकाश बिलावर यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले. यावेळी डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. वर्षा मैंदर्गी, डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. शरद बनसोडे, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. प्रभंजन माने, डॉ. अक्षय सरवदे, डॉ. सचिनकुमार पाटील, डॉ. शिवराज थोरात, डॉ. वैभव ढेरे, गजानन पळसे आदी उपस्थित होते.

02 JAN 2025
पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वाचनातून जाणिवासमृद्ध माणूसपण घडते

**कोल्हापूर: पुढारी वृत्तसेवा**

वाचन ही सातत्यपूर्ण प्रक्रिया असून वाचनातूनच जाणिवासमृद्ध माणूसपण घडते, असे प्रतिपादन राजाराम महाविद्यालयातील डॉ. धनंजय देवळालकर यांनी केले.

महाराष्ट्र शासनाच्या मवाचन संकल्प महाराष्ट्राचाफ उपक्रमांतर्गत शिवाजी विद्यापीठात सकाळी वाचन कौशल्य कार्यशाळा व सामूहिक वाचन उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी.टी, शिर्के होते. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील प्रमुख उपस्थित होते. डॉ. देवळालकर म्हणाले, अभ्यासातील क्रमिक पुस्तके आपल्याला हुशार बनवितात. पण शहाणे व्हायचे असेल तर अवांतर वाचनाकडे वळायला हवे.

## डॉ. धनंजय देवळालकर; वाचन संकल्प महाराष्ट्र उपक्रम

अवांतर पुस्तके खऱ्या अर्थाने विवेकी माणूस घडवितात. आपल्याला सजग बनवितात, समृद्ध बनवितात आणि जगाकडे पाहण्याचा दृष्टीकोन प्रदान करतात. वेळेचे योग्य नियोजन करून अधिकाधिक वेळेचा विनियोग आपण वाचनासाठी केल्यास आपले व्यक्तीमत्त्व खऱ्या अर्थाने समृद्ध बनेल.

प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील म्हणाले, कोणत्याही वाचनामागील वाचकाचा हेतू हा खूप महत्त्वाचा असतो. वाचनातून आपल्याला नेमके काय साध्य करावयाचे आहे, समजून घ्यायचे आहे, ते विद्यार्थ्यांनी मनाशी ठरविले पाहिजे. अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, विद्यार्थ्यांनी जगभरातील व्यक्तीमत्त्वांना पुस्तकाच्या माध्यमातून जाणून घेतले पाहिजेच, पण त्याचबरोबरीने आपल्या परिसरातील, भोवतालातील माणसांनाही पुस्तकाद्वारे जाणून घेतले पाहिजे. बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. धनंजय सुतार यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. उपग्रंथपाल डॉ. प्रकाश बिलावर यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे यांनी आभार मानले.

**पुस्तकांचे एक तास सामूहिक वाचन**

राजर्षी शाहू सभागृहात आण्णासाहेब लठ्ठे लिखित मश्री शाहुंचे चरित्रफ (श्रीशाहुचरितम्) आणि महात्मा गांधी यांच्या मसत्याचे प्रयोग एवं आत्मकथाफ या पुस्तकांतील निवडक उताऱ्यांचे विद्यार्थ्यांनी एक तास सामूहिक वाचन केले.

जनसंपर्क कक्ष
02 JAN 2025 लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वाचनातून जाणिवासमृद्ध माणूसपण घडते

## धनंजय देवळालकर : विद्यापीठात वाचन कौशल्य कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : वाचन ही सातत्यपूर्ण प्रक्रिया असून, वाचनातूनच जाणिवासमृद्ध माणूसपण घडते, असे प्रतिपादन राजाराम महाविद्यालयातील डॉ. धनंजय देवळालकर यांनी बुधवारी केले.



शिवाजी विद्यापीठात वाचन कौशल्य कार्यशाळा आणि सामूहिक वाचन उपक्रमात ते बोलत होते. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते तर प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील प्रमुख उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, विद्यार्थ्यांनी जगभरातील व्यक्तिमत्त्वांना पुस्तकाच्या माध्यमातून जाणून घेतले पाहिजेच; पण त्याचबरोबरीने आपल्या परिसरातील, भोवतालातील माणसांनाही पुस्तकाद्वारे जाणून घेतले पाहिजे. डॉ. धनंजय सुतार यांनी स्वागत केले. उपग्रंथपाल डॉ. प्रकाश बिलावर यांनी परिचय करून दिला. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले.

कार्यक्रमास वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, प्राचार्य डॉ. वर्षा मैंदर्गी, डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 JAN 2025
पुण्यनगरी

# 'भारतीय भूचुंबकत्व'च्या सहकार्याने विद्यापीठात कार्यशाळा

कोल्हापूर : प्रतिनिधी

शिवाजी विद्यापीठाचा भौतिकशास्त्र अधिविभाग आणि नवी मुंबई येथील भारतीय भूचुंबकत्व संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने 'ॲटमॉस्फिअर-आयनोस्फिअर डायनॅमिक्स : ऑब्झर्व्हेशन्स अँड डेटा ॲनालिसिस' या एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

शुक्रवार, दि. ३ रोजी भौतिकशास्त्र अधिविभागात कार्यशाळा होणार आहे. कार्यशाळेत देशभरातील राष्ट्रीय संशोधन संस्थांमधील शंभरांहून अधिक युवा संशोधक, पदव्युत्तर व पीएच.डी. स्तरावरील विद्यार्थी सहभागी होणार आहेत.

भारतीय भूचुंबकत्व संस्थेचे संचालक प्रा. ए. पी. डिमरी यांच्या हस्ते आणि कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली कार्यशाळेचे उद्‌घाटन होणार आहे. कार्यशाळेत एस. गुरुबरण, डॉ. आलोक ताओरी, डॉ. सतीशकुमार, डॉ. श्रीपती, डॉ. राजीव व्हटकर, डॉ. गोपी सिमला आणि डॉ. नवीन परिहार हे विविध विषयांवर मार्गदर्शन करणार आहेत, अशी माहिती शिवाजी विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. आर. जी. सोनकवडे यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 JAN 2025
तरुण भारत



# शिवाजी विद्यापीठात उद्या कार्यशाळा

**कोल्हापूर :** क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठातील स्त्री अभ्यास केंद्राच्यावतीने अधिविभागातील महिला प्राध्यापक आणि अधिकाऱ्यासाठी 'अभ्यासक्रमातील महिलांविषयक दृष्टीकोन' यावर शुक्रवारी, ३ रोजी कार्यशाळेचे आयोजन केले आहे. स्त्री अभ्यास केंद्राच्या सेमिनार हॉलमध्ये सकाळी ११ वाजता कार्यशाळा होणार आहे. कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी आहेत. यावेळी 'संवादसेतू' व्यासपीठाचे उद्‌घाटन होणार आहे. या कार्यशाळेचा लाभ घ्यावा, असे आवाहन स्त्री अभ्यास केंद्राच्या संचालक डॉ. निशा मुडे-पवार यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 JAN 2025

लोकमत

# विद्यापीठात उद्या राष्ट्रीय कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा भौतिकशास्त्र अधिविभाग आणि नवी मुंबई येथील भारतीय भूचुंबकत्व संस्थेच्या वतीने उद्या, शुक्रवारी 'ॲटमॉस्फिअर-आयनोस्फिअर डायनॅमिक्स: ऑब्झर्व्हेशन्स अँड डेटा ॲनालिसिस या एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले आहे. भौतिकशास्त्र अधिविभागात कार्यशाळा होणार आहे. कार्यशाळेत देशभरातील राष्ट्रीय संशोधन संस्थांमधील शंभरहून अधिक युवा संशोधक, पदव्युत्तर व पीएच.डी. स्तरावरील विद्यार्थी सहभागी होणार आहेत. भारतीय भूचुंबकत्व संस्थेचे संचालक प्रा. ए. पी. डिमरी यांच्या हस्ते आणि कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली कार्यशाळेचे उद्घाटन होणार आहे. कार्यशाळेत एस. गुरुबरण, डॉ. आलोक ताओरी, डॉ. सतीशकुमार, डॉ. श्रीपती, डॉ. राजीव व्हटकर, डॉ. गोपी सिमला आणि डॉ. नवीन परिहार यांचे विविध विषयांवर मार्गदर्शन होणार असल्याची माहिती भौतिकशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. आर. जी. सोनकवडे यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 JAN 2025
सकाळ

# विद्यापीठात उद्या कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा भौतिकशास्त्र अधिविभाग आणि नवी मुंबई येथील भारतीय भूचुंबकत्व संस्थेतर्फे 'ॲटमॉस्फिअर-आयनोस्फिअर डायनॅमिक्स : ऑब्झर्व्हेशन्स अँड डेटा ॲनालिसिस' या विषयावर शुक्रवारी (ता. ३) भौतिकशास्त्र अधिविभागात कार्यशाळा होणार आहे. त्यात देशभरातील राष्ट्रीय संशोधन संस्थांमधील शंभरहून अधिक युवा संशोधक, पदव्युत्तर व पीएच.डी. स्तरावरील विद्यार्थी सहभागी होणार आहेत. भारतीय भूचुंबकत्व संस्थेचे संचालक प्रा. ए. पी. डिमरी यांच्या हस्ते आणि कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली कार्यशाळेचे उद्घाटन होणार आहे.

कार्यशाळेत एस. गुरुबरण, डॉ. आलोक ताओरी, डॉ. सतीशकुमार, डॉ. श्रीपती, डॉ. राजीव व्हटकर, डॉ. गोपी सिमला, डॉ. नवीन परिहार मार्गदर्शन करणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 JAN 2025
पुढारी

# शिवाजी विद्यापीठात उद्या राष्ट्रीय कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा भौतिकशास्त्र अधिविभाग व नवी मुंबई येथील भारतीय भूचुंबकत्व संस्था (भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागांतर्गत स्वायत्त संस्था) यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी (दि. ३) 'ॲटमॉस्फिअर-आयनोस्फिअर डायनॅमिक्स : ऑब्झर्व्हेशन्स अँड डेटा ॲनालिसिस' एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. भारतीय भूचुंबकत्व संस्थेचे संचालक प्रा. ए. पी. डिमरी यांच्या हस्ते व कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली कार्यशाळेचे उद्घाटन होणार आहे. कार्यशाळेत एस. गुरुबरण, डॉ. आलोक ताओरी, डॉ. सतीशकुमार, डॉ. श्रीपती, डॉ. राजीव व्हटकर, डॉ. गोपी सिमला व डॉ. नवीन परिहार यांची विविध विषयांवर मार्गदर्शन करणार आहेत. कार्यशाळेमध्ये विषयतज्ज्ञांच्या व्याख्यानाबरोबरच डेटा विश्लेषण तंत्रांवरील सत्रे व प्रात्यक्षिके सादर केली जाणार आहेत, अशी माहिती शिवाजी विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. आर. जी. सोनकवडे यांनी दिली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 JAN 2025
पुढारी

# विद्यापीठात आज व्याख्यान

कोल्हापूर : महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या स्मृतिदिनानिमित्त गुरुवारी (दि. २) सकाळी १० वाजता शिवाजी विद्यापीठाच्या महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनातर्फे अभ्यासक संपत देसाई (आजरा) यांचे व्याख्यान आयोजित केले आहे. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के असतील. व्याख्यानास उपस्थित राहावे, असे आवाहन कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 JAN 2025
लोकमत

# विद्यापीठात संपत देसाईंचे आज व्याख्यान

कोल्हापूर : महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या स्मृतिदिनानिमित्त 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या उपक्रमांतर्गत आज, गुरुवारी (दि. २) सकाळी १० वाजता शिवाजी विद्यापीठाच्या महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनातर्फे सामाजिक कार्यकर्ते व अभ्यासक संपत देसाई यांचे विशेष व्याख्यान आयोजित केले आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी असतील. या व्याख्यानासाठी सर्वांनी उपस्थित राहावे, असे आवाहन कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले.